**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. १२

सभावृत्तांत

दिनांक १३/०३/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे मार्च २०१५ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १३/०३/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृह येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्षा |
| २. | मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ३. | मा.श्रीम. काळे विमल रमेश | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती पाडाळे निता विलास | सदस्या |
| ५. | मा.श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ६. | मा.श्रीमती तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| १०. | मा. श्री.कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ११. | मा.श्री. नांदगुडे विलास एकनाथ | सदस्य |
| १२. | मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| १३. | मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| १४. | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| १५. | मा. श्री. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

----------

याशिवाय मा. मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा. गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. एस.एस. चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. गट्टुवार कार्यकारी अभियंता जलनि:सारण, मा.प्रमोद ओंबासे, उपअभियंता,बीआरटीएस, मा.अनिल राऊत, उपअभियंता, बीआरटीएस, मा. अजय जाधव, मा. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. सौदाई, सोनवणे, कोतवडेकर, आरोग्य निरीक्षक, मा. अंकुश कोंडे, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य विभाग इ. अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. अध्यक्षा यांनी बैठकीस सुरुवात करणेबाबत सूचना दिल्या.

सचिव – ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. ११ माहे फेब्रुवारी २०१५ चा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

मा. अध्यक्ष – ड प्रभाग समिती माहे फेब्रुवारी २०१५ चा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सचिव – ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. १२ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र.५१ विषय क्र. १

दिनांक १३/०३/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक– मा. काटे शत्रुघ्न उर्फ बापू सीताराम

संदर्भ – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा दिनांक १०/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे सौदागर प्रभाग क्र. ५५ येथील महादेव मंदिराजवळ जुना पीएमपीएमएल बसस्टॉप असुन तो पूर्णपणे मोडकळीस आलेला आहे.तिथे प्रवाशांची बरीच गर्दी असते. सदर बसस्टॉप व्यवस्थित नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. सदर बसस्टॉपचे नुतनीकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

ठराव क्र.५२ विषय क्र. २

दिनांक १३/०३/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक– मा. मा. काटे शत्रुघ्न उर्फ बापू सीताराम

संदर्भ – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा दिनांक १०/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

रहाटणी प्रभाग क्र. ५५ येथील मनपा शाळेजवळ जुना पीएमपीएमएल बसस्टॉप असुन तो पूर्णपणे मोडकळीस आलेला आहे.तिथे प्रवाशांची बरीच गर्दी असते. सदर बसस्टॉप व्यवस्थित नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. सदर बसस्टॉपचे नुतनीकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

१) ड क्षेत्रिय कार्यालय विद्युत वि भागाकडील “वीजबिले “ व “हायड्रोलिक लॅडर वाहने भाडयाने घेणे या लेखाशिर्षावरील तरतुद “स्थायी आस्थापना” या लेखाशिर्षावर वर्ग करणे

२) काळेवाडी येथील कै. बंडू नामदेव नढे प्राथमिक शाळेमध्ये उर्दुचे वर्ग घेतले जात असुन सदर उर्दु वर्गांना जैनाबी उर्दु शाळा असे नामकरण करणे

३) प्रभाग क्र. ४७ काळेवाडी ज्योतिबानगर येथील ज्योतिबा विठ्ठल रुखमाई व (ज्ञानेश्वर) माऊली मंदिर ही मंदिरे एकत्र असल्यामुळे कॉलनीच्या सुरुवातीला कमान करणे

४) प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख प्रभागातील मौजे वाकड येथील स.नं. २१० रहिवाशी विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता असल्याने महापालिकेच्या मंजुर विकास आराखडयातील ४५ मीटर डी.पी. रस्त्यापर्यंत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ मधुन १८ मी. रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील स.नं. २१० मधुन ४५ मीटर रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२मीटर नॉन डीपी रस्ता घोषित करणे

ऐनवेळी दाखल करण्यात आलेल्या वरील विषयावर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र.५३ विषय क्र. २

दिनांक १३/०३/२०१५ विभाग – विद्युत

संदर्भ : ड क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र.डक्षे/वि/१/कावि/२४०/२०१५ दि. ४/३/२०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाचे विद्युत विभागाकडील “स्थायी आस्थापना” या लेखाशिर्षावरील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी र.रु. ३,७०,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली होती. माहे फेब्रुवारी २०१५ अखेर “स्थायी आस्थापना “ या लेखाशिर्षावरुन र.रु. २,९९,३३०१९/- इतका खर्च झाला असुन माहे माहे फेब्रुवारी २०१५ चे मासिक वेतन बील र.रु. ७,२६,४२३/- अदा करणेकामी तसेच माहे जानेवारी २०१५ चे अतिकालिन भत्ता बील अदा करणेकामी र.रु. २,९०,०००/- अशी एकूण र.रु. १०,१६,४२३/- तरतूद कमी पडत आहे. सबब विद्युत विभागाकडील “वीजबिले” या लेखाशिर्षावरील दि. ३/३/२०१५ रोजी असलेल्या शिल्लक तरतुद र.रु. ९,०७,२३०/- मधुन र.रु. ५,५०,०००/- व “हायड्रोलिक लॅडर वाहने भाडयाने घेणे” या लेखाशिर्षावरील दिनांक ८/१/२०१५ रोजीच्या शिल्लक तरतुद र.रु. ११,१४,५६५/- मधुन र.रु. ५,००,०००/- अशी एकूण र.रु. १०,५०,०००/- तरतुद स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणेस या प्रस्तावाने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

ठराव क्र.५४ विषय क्र. ३

दिनांक १३/०३/२०१५ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक – मा.विनोद जयवंत नढे अनुमोदक– मा.निता विलास पाडाळे

संदर्भ – मा. विनोद जयवंत नढे यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी येथे कै. बंडू नामदेव नढे प्राथमिक शाळा असुन सदर शाळेमध्ये उर्दुचे वर्ग घेतले जात असुन सदर उर्दु वर्गांना जैनाबी उर्दु शाळा असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

ठराव क्र.५५ विषय क्र. ४

दिनांक १३/०३/२०१५ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक – मा.निता विलास पाडाळे अनुमोदक– मा. विनोद जयवंत नढे

संदर्भ – मा. मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ काळेवाडी ज्योतिबानगर येथील ज्योतिबा विठ्ठल रुखमाई व (ज्ञानेश्वर) माऊली मंदिर ही मंदिरे एकत्र असल्यामुळे कॉलनीच्या सुरुवातीला कमान करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

ठराव क्र.५६ विषय क्र. ५
दिनांक १३/०३/२०१५ विभाग - नगररचना
सुचक – मा.आरती सुरेश चोंधे अनुमोदक– मा. राजेंद्र गणपत जगताप

संदर्भ – मा. आरती सुरेश चोंधे यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख प्रभागातील मौजे वाकड येथील स.नं. २१० रहिवाशी विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता असल्याने महापालिकेच्या मंजुर विकास आराखडयातील ४५ मीटर डी.पी. रस्त्यापर्यंत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ मधुन १८ मी. रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील स.नं. २१० मधुन ४५ मीटर रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८ मीटर नॉन डीपी रस्ता घोषित करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

यानंतर मा. ड प्रभाग समिती सदस्यांनी ड क्षेत्रिय कार्यालय परिसरातील विविध समस्यांबाबत आपले मत मांडले.

**मा. निता विलास पाडाळे**: – कचरा उचलणेच्या कामासाठी नेमून दिलेल्या गाडया नियमितपणे येत नाहीत.

**सहा. आरोग्याधिकारी बेंडाळे** :– एकूण पाच गाडया कचरा उचलणेकामी नेमलेल्या आहेत. मध्यंतरीच्या काळात टायर अभावी कामात अडचणी होत्या परंतु आता गाडया वेळेत येऊन कचरा उचलणेचे काम करीत आहेत. संबंधितांना सन्मा. सदस्यांशी संपर्क साधून समन्वय साधुन कामकाज करणेबाबत सूचना देणेत येतील.

**मा.विनोद नढे** :– सहकार कॉलनी क्रमांक २ व ३ मधील भूयारी गटर योजनेचे कामकाज करणारे ठेकेदार यांची नागरीकांशी बोलण्याची पध्दत योग्य नाही. पिण्याच्या पाण्याचे कनेक्शनवर भूयारी गटाराचे पाईप टाकण्यात येत आहेत. कामाचा दर्जा निकृष्ठ आहे. सदर कामाची पाहणी करावी. सदर बाबीस मा. निता पाडाळे यांनी अनुमोदन दिले. सदर कामाचा राडारोडाही उचलणेत आलेला नाही.

**मा. अनिता मच्छिंद्र तापकीर** :– कचरा गाडयांचे टायर पंक्चर झाले तर पर्यायी गाडीची उपलब्धता होत नाही. स्टेपनीची गरज आहे.

**सहा. आरोग्याधिकारी बेंडाळे** :– सदर कामी एका स्वतंत्र वाहनाची सोय करण्यात आली आहे.

**मा. राजेंद्र जगताप**: – सर्वप्रथम मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता व मा. जावळे, उपअभियंता यांचे अभिनंदन करतो. गेल्या ७-८ वर्षापासुन असलेला पाण्याचा प्रश्न आता सुटला आहे. तसाच प्रभाग क्र. ५६ येथील मशिदीच्या जवळच्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा प्रश्न स्थापत्य विभागाने सोडवावा. ज्या ठिकाणी पोलीस बंदोबस्ताची आवश्यकता आहे त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन घेणेकामी पोलीस खात्यास रितसर पत्र देऊन पाठपुरावा करुन कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी. सद्यस्थितीत पत्रा शेडचे अतिक्रमण वाढले असुन ते लवकरात लवकर काढण्याची कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता ड क्षे का स्थापत्य श्री. दांगट:** – प्रभाग क्र. ५६ मध्ये मशिदीच्या जागेबाबत कार्यवाही शेवटच्या टप्प्यात आहे.

**मा. कैलासभाऊ थोपटे** – रायगड कॉलनी ते नखाते वस्ती या १५ फुटी रस्त्यावर दोन्ही बाजूंना हातगाडयांनी अतिक्रमण चालू आहे. सदर हातगाडयांचे कायम स्वरुपी अतिक्रमण हटविणेत यावे.

**प्रशासन अधिकारी** :- हॉकर्स झोनची कार्यवाही करण्यात येत आहे. दरम्यान रस्त्यावर अतिक्रमण करणा-या हातगाडयांवर नियमित कारवाई करण्यात येत आहे.

**मा. अनिता मच्छिंद्र तापकीर**: – नवीन पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच डांबरीकरणाची कामे चालू नाहीत. तापकीरनगर येथे खड्डयांचे प्रमाण खुप आहे.

**कार्यकारी अभियंता स्थापत्य श्री. दांगट** :- डांबरीकरण व पेव्हींग ब्लॉक बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

**मा. निता विलास पाडाळे**: – एम एम स्कुल समोर सिग्नल चालू असुन तेथे कोणीही वाहतुक पोलीस नसतो. बीआरटी विभागाने या बाबत काय कार्यवाही केली आहे तसेच बीआरटीएस विभागाकडून काय कामे करण्यात येतात याची माहिती सन्मा. नगरसदस्यांना देणेत येत नाही. ज्योतिबा कॉलनी येथील कामकाज झालेले नाही. कामाचा दर्जा निकृष्ठ आहे. स्टॉर्म वॉटर ड्रेनेजचे साफसफाई व्यवस्थित नाही.

**मा. राऊत, उपअभियंता बीआरटीएस**: – सदर रस्त्यावरील सिग्नलचे ऑपरेशनचे कामकाज विद्युत विभागाकडून करण्यात येते. उर्वरीत ज्या ज्या ठिकाणच्या तक्रारी प्राप्त होतील त्या त्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल.

**मा. आरती चोंधे**:- पशू वैद्यकीय विभागाचे कामकाज अतिशय खराब आहे. रस्त्यावरील मोकाट कुत्री व डुकरे यांचा बंदोबस्त लवकरात लवकर करावा. मा. निता पाडाळे , मा. थोपटे सो.यांनी त्यास अनुमती दिली.

**पशू वैद्यकीय अधिकारी**:- या कामी नवीन एजन्सी नेमणेत येत आहे.

**मा. शत्रुघ्न उर्फ बापू काटे:-** व्होडाफोन, बीएसएनएल, व इतर खाजगी कंपन्या ज्या भूमिगत केबलचे कामासाठी रस्ता खोदाईचे कामासाठी महापालिकेकडे पैसे भरतात सदर निधी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडे वर्ग करावा वा रस्ता खोदाईचे प्रस्ताव प्रभाग समितीपुढे मंजुरीसाठी सादर करावेत.

**सही/-**
(सौ. आरती सुरेश चोंधे)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ४४/२०१५
दिनांक – ०८/०५ /२०१५

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा सचिव**
(सभाशाखा),
ड प्रभाग समिती